1973 पासून

# कोकण मर्कंटाईल को-ऑप बँक लिमिटेड मल्टी स्टेट बँक

नोंदणीकृत कार्यालय: पहिला मजला, हार्बर क्रेस्ट, माझगाव टी.टी. मुंबई 400010. । फोन: 23723753, 23729968, 23729970, 23729971, 23734202, 23734311. फॅक्स : 23748589 । वेब : www.kokanbanknet

## विक्री सूचना

प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे कर्जदार, सह-कर्जदार, गहाणकार व जामीनदार आणि आम जनतेस सूचित करण्यात येते की कोकण मर्कंटाईल को-ऑप बँक लिमिटेड कडे तारण असलेल्या खाली नमूद मालमत्तेचा सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत दि. 23.04.2026 रोजी प्रत्यक्ष ताबा घेण्यात आलेला असून तिची तिसेकर मुबीन अन्वर यांच्या खाली दिल्यानुसार कर्ज खाते क्र.न 8069/7032 दाखल दि. 09.07.2026 रोजीनुसार रु. 11,35,739.64 (रुपये अकरा लक्ष पस्तीस हजार सातशे एकोणचाळीस आणि चौसष्ट पैसे फक्त) अधिक वार्षिक 11% दराने पुढील व्याज एवढ्या सुरक्षित कर्जाच्या वसुलीसाठी खाली नमूद केल्यानुसार निविदा नि जाहीर लिलावाच्या माध्यमातून विक्री करण्यात येईल:

मालमत्तेची विक्री फर्निचर व फिक्सचर्स शिवाय ''जशी आहे जेथे आहे आणि जशी आहे जे काही आहे'' तत्त्वावर / अटीवर करण्यात येईल.

| अ. क्र. | नाव | मालमत्तेचे वर्णन | मालमत्तेची स्थिती | आरक्षित किंमत | बयाणा रक्कम (रु. मध्ये) | पाहणीचा दिनांक व वेळ | विक्रीचा दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | कर्ज खाते क्र. 869/7032 - माझगाव रे रोड शाखा | सदनिका क्र. 606, सुमारे 208 चौ.फू. (चटई + बाल्कनी 11 चौ.फू.), सहावा मजला, बिल्डींग क्र. ए-6, झरबिया अंबी, अंबी गाव, ता. मावळ, जिल्हा पुणे, गट क्र. 236, 39, 40, 339, झरबिया अंबी, नोंदणी जिल्हा पुणे आणि उप-नोंदणी जिल्हा मावळ. | बँकेच्या प्रत्यक्ष ताब्यात आहे | रु. 9,55,000/- | रु. 95,500/- | 13.08.2026 स. 11 ते दु. 4.00 वाजेपर्यंत | 21.08.2026 रोजी स. 11 वाजता |
| 1 | श्री मुबीन अन्वर तिसेकर - कर्जदार व गहाणकार | | | | | | |
| 2 | श्रीमती तबस्सुम मुबीन तिसेकर - सह-कर्जदार व गहाणकार | | | | | | |
| 3 | श्री अब्दुल रहमान अब्दुल कोंडकर -जामीनदार | | | | | | |
| 4 | श्री खुर्शीद अहमद मो. रजा -जामीनदार | | | | | | |

इच्छुक खरेदीदार वर नमूद दिनांक व वेळी मालमत्तेची पाहणी करू शकतात.

वर नमूद अचल अनामत मालमत्तेच्या संदर्भात तपशील निम्नस्वाक्षरीकारांच्या माहितीप्रमाणे देण्यात आले असले तरीही सदर तपशिलामध्ये काही चूक झाल्यास, चुकीचे विधान करण्यात आल्यास किंवा काही गाळण्यात आल्यास त्यासाठी ते जबाबदार नसतील. जाहीर लिलावाच्या अटी व शर्ती:

1) विक्री ही पूर्णपणे खाली नमूद अटी व शर्तींच्या अधीन असेल.

2) मालमत्तेची विक्री फर्निचर व फिक्सचर्स शिवाय ''जशी आहे जेथे आहे आणि जशी आहे जे काही आहे'' अटीवर करण्यात येईल.

3) लिलावांतर्गत मालमत्तेची वर नमूद दिनांक व वेळी पाहणी करता येईल. मालमत्तेच्या पाहणीशी किंवा निविदा सादरीकरणाशी संबंधित कोणत्याही चौकशीसाठी कृपया प्राधिकृत अधिकारी - कोकण मर्कंटाईल को-ऑप बँक लिमिटेड, पहिला मजला, हार्बर क्रेस्ट, माझगाव टी.टी. मुंबई 400010. फोन: 9820547700 / 9833657955 यांचेशी संपर्क साधावा.

4) इच्छुक खरेदीदार वरील मालमत्तेसाठी आपले प्रस्ताव एका मोहरबंद लिफाफ्यात बयाणा रकमेच्या डिमांड ड्राफ्टसह प्राधिकृत अधिकारी, कोकण मर्कंटाईल को-ऑप बँक लिमिटेड, पहिला मजला, हार्बर क्रेस्ट, माझगाव टी.टी. मुंबई 400010 यांचे कार्यालयात दि. 18.08.2026 पर्यंत जमा करावेत. प्राधिकृत अधिकारी हे मोहरबंद लिफाफे विक्रीच्या वेळी म्हणजे दि. 21.08.2026 रोजी स. 11 वाजता उपलब्ध इच्छुक बोलीदार, कर्जदार, सह-कर्जदार, गहाणकार व जामीनदारांच्या उपस्थितीत पहिला मजला, हार्बर क्रेस्ट, माझगाव टी.टी. मुंबई 400010 येथे उघडण्यात येतील.

5) अटी असलेले किंवा न भरलेले प्रस्ताव किंवा बयाणा रक्कम सोबत न जोडलेले प्रस्ताव किंवा येथे विहित करण्यात आलेल्या दिनांक व वेळेनंतर प्राप्त होणारे प्रस्ताव विचारात घेण्यात येणार नाहीत / वैध मानण्यात येणार नाहीत आणि ते फेटाळण्यात येतील. बयाणा रकमेवर व्याज देण्यात येणार नाही.

6) प्रस्ताव दस्तावेजासोबत इच्छुक बोलीदारांनी केवायसी दस्तावेजाची (PAN कार्ड व पत्त्याचा पुरावा) प्रतसुद्धा जोडावी.

7) कोणत्याही परिस्थितीत मालमत्तेची आरक्षित किंमतीपेक्षा कमी रकमेस विक्री करण्यात येणार नाही.

8) सुरक्षित धनको म्हणजे कोकण मर्कंटाईल को-ऑप बँक लि. द्वारे बोली स्वीकारण्यात आल्यास मालमत्तेची विक्री सर्वोच्च बोलीदार / प्रस्तावदारास करण्यात येईल. परंतु, आवश्यक वाटल्यास आपसांत बोली करण्याची परवानगी देण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकारांना आहे ही प्रक्रिया सदर जागी, दिनांकास व वेळी करण्यात येईल.

9) लिलाव / आपसांत बोलीसुद्धा त्याच ठिकाणी करण्यात येईल आणि येथे इच्छुक बोलीदार उपस्थित राहू शकतात आणि आपले प्रस्ताव थेट सादर करू शकतात आणि आपल्या प्रस्तावामध्ये वाढ करू शकतात.

10) सदर मालमत्तेच्या संदर्भात सर्व अतिदेय रकमांसह सर्व थकबाकी व देणी म्हणजे महापालिका कर, मेंटेनन्स / सोसायटी शुल्के, वीज व पाणी पुरवठा कर किंवा इतर कोणतीही थकबाकीचा भरणा यशस्वी बोलीदारास / खरेदीदारास करावा लागेल.

11) यशस्वी बोलीदार / खरेदीदारास विक्रीच्या संदर्भात प्राधिकृत अधिकाऱ्यांनी प्रस्ताव स्वीकारण्याच्या दिनांकापासून 2 कामकाजाच्या दिवसांत ताबडतोब खरेदी रकमेच्या 25% एवढी रक्कम (तोवर भरलेली बयाणा रक्कम समायोजित करून) जमा करावी लागेल, अन्यथा जमा केलेली बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

12) विक्री किंमतीपैकी उर्वरित 75% रकमेचा भरणा प्राधिकृत अधिकाऱ्याने यशस्वी खरेदीदाराच्या नावे विक्रीची निश्चिती केल्याच्या दिनांकापासून 15 दिवसांचे आत करावा लागेल. विक्री किंमतीपैकी उर्वरित 75% रकमेचा किंवा इतर कोणत्याही भागाचा भरणा विहित कालावधीत न केल्यास जमा केलेली रक्कम जप्त करण्यात येईल आणि सुरक्षित धनको पुन्हा एकदा मालमत्तेची विक्री करण्यास स्वतंत्र असतील आणि खरेदीदाराचे मालमत्तेवरील किंवा खरेदीदाखल तोवर भरलेल्या कोणत्याही रकमेवरील सर्व दावे संपुष्टात येईल.

13) ही विक्री सुरक्षित धनकोच्या पुष्टीच्या अधीन असेल.

14) विक्रीची पुष्टी होण्याच्या दिनांकापासून वर वर्णन केलेली अचल मालमत्ता आग किंवा चोरी किंवा इतर अपघात आणि इतर धोके यांपासून होणाऱ्या क्षतीसह सर्व बाबतीत खरेदीदाराची जबाबदारी व जोखीम असेल. कोणत्याही स्वरूपाच्या कारणास्तव विक्री रद्द करण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकाऱ्यास नसेल.

15) मालमत्तेवरील सोसायटीच्या थकबाकीसह कोणतीही वैधानिक व इतर थकबाकीचा भरणा करण्याची आणि वर नमूद मालमत्तेसाठी विक्री प्रमाणपत्राची नोंदणी करण्याच्या संदर्भात मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्के, हस्तांतरण शुल्के आणि इतर कोणतेही खर्च व शुल्के यांचा भरणा करण्याची जबाबदारी यशस्वी बोलीदाराची असेल.

16) इच्छुक बोलीदार / प्रस्तावकार किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांचेशिवाय इतर कुणाही व्यक्तीस लिलाव / विक्री प्रक्रियेमध्ये सहभागी होता येणार नाही.

17) ही विक्री सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 मधील तरतुदी व नियमांनुसार राबविण्यात येईल.

### सर्फेसी अधिनियम, 2002 मधील नियम 8(6) अंतर्गत 30 दिवसांची वैधानिक विक्री सूचना

याद्वारे कर्जदार, सह-कर्जदार, गहाणकार आणि जामीनदार यांना सूचित करण्यात येते की त्यांनी वर नमूद अद्ययावत थकबाकीचा आणि आनुषंगिक खर्चाचा आजपासून 30 दिवसांचे आत भरणा करावा, अन्यथा मामात्तेची विक्री करण्यात येईल आणि काही थकबाकी शिल्लक राहिल्यास ती व्याज व शुल्कांसह वसूल करण्यात येईल.

स्थान: ठाणे
दिनांक: 10.07.2026

प्राधिकृत अधिकारी, स्वा/-
कोकण मर्कंटाईल को-ऑप बँक लिमिटेड